# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


### प्रेस नोट

दिनांक 22/09/2020 (मंगळवार)
(सायंकाळ)

---

### देवलापार पोलीसांची अवैधरीत्या जनावर वाहतुक करणाऱ्यांवर कार्यवाही

पो.स्टे. देवलापार :– दिनांक 21/09/2020 रोजी सपोनि प्रविण बोरकुटे ठाणेदार पो. स्टे. देवलापार यांना गोपनीय माहिती मिळाली की, मौजा खवासा येथुन नागपूरकडे जनावर वाहतुक होणार आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन सपोनि प्रविण बोरकुटे यांच्या मार्गदर्शनात नेमण्यात आलेले नाकाबंदी करीता पोलीस स्टाफ मौजा मानेगावटेक एनएच 7 रोड येथे नाकाबंदी करीत असतांना खवासा रोडने 05.00 वा. चे सुमारास भरधाव वेगाने एक संशयीत कंटेनर वाहन येतांना दिसले तेव्हा मानेगावटेक येथे नाकाबंदी ठिकाणी थांबविण्याच प्रयत्न केले असता, सदर वाहन नाकांबदी ठिकाणी न थांबता भरधाव वेगाने नागपुरकडे पळाले असता पोलीसांनी सदर वाहनाचा पाठलाग करून मौजा मोरफाटा येथे सदरचे वाहन मोठया शिताफीने थांबवुन आर.जे.– 14/ जी.ई – 9637 क्रमांकाच्या ट्रकची तपासणी केली असता सदर वाहनात गोवंश जातीचे 30 (बैल) जनावरे अत्यंत क्रुरतेने व निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. यातील आरोपी नामे– 1) सदाम हुसेन मिसरी खान वय 25 वर्ष, 2) हमीद जिवा बंजारा वय 36 वर्ष, दोन्ही रा. ईस्लामपुरा राजस्थान यांच्या ताब्यातुन जनावर कि. 4,50,000/–रू. वाहनाची कि. 20,00,000/–रू. असा एकुण किंमती 24,50,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक श्री. मुन्ना पांडे, पो.स्टे. देवलापार यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1)(डी)(ई)(एफ) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ), 9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम तसेच सहकलम 34 भादवी सहकलम 179, 184 मो.वा.का. काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि केशव पुंजरवाड हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राऊत, उपविभागीय पोलीस अधीकारी श्रीमती नयन आलूरकर रामटेक विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री. प्रविण बोरकुटे, पोउपनि पुंजरवाड, पोना मुन्ना पांडे, पोशि कुलदिप आहके, रमेश खरकटे, गजानन जाधव यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर